महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

# आरोग्य विभाग गट क व ड पदभरती २०१६ - अंतिम निवड यादीबाबत

आरोग्य सेवेतील गट क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांची रिक्त जागेच्या प्रमाणात अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल व या यादीतील उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणी व समुपदेशनाकरीता दि. ८ जून २०१८ रोजी बोलावण्यात येईल याबाबतची सुचना दि.२४.०५.२०१८ रोजी आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापी मे २०१८ मध्ये सर्वसाधारण बदल्यांचे कामकाज मोठ्या प्रमाणात असल्याने ठाणे विभाग वगळता उर्वरीत विभाग निवड याद्या प्रसिद्ध करू शकलेले नाहीत. त्यामूळे पात्र उमेदवारांना मुलाखत पत्रही पाठविण्यात आलेली नाहीत. त्यामूळे या विभागात दि. ०८.०६.२०१८ रोजी समुपदेशन फेरीचे आयोजन शक्य नसल्याने आता सदर समुपदेशन फेरी ही दि. १८.०६.२०१८ ते २२.०६.२०१८ या कालावधीत घेण्यात येईल. प्रत्येक विभाग त्यांच्या स्तरावर या कालावधीतील एका दिवशी समुपदेशन फेरीची तारीख़ निश्चित करतील व त्यानुसार पात्र उमेदवारांस मुलाखत पत्र पाठवतील. सदर समुपदेशन फेरी ही अंतिम फेरी असेल व या नंतर कोणतीही निवड यादी, प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येणार नाही किंवा समुपदेशन फेरीचे आयोजन करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. त्यामूळे या फेरीस अनुपस्थित राहण्याऱ्या उमेदवारांचा त्यानंतर विचार करण्यात येणार नाही.

सदर समुपदेशन फेरीकरीता आवश्यक पत्र संबंधित नियुक्ती प्राधिकारी उमेदवारांच्या अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर तसेच इमेल नोंदवला असल्यास त्यावर पाठवतील. तसेच अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर लघु-संदेश पाठवतील. याबाबत काही शंका असल्यास आपण परीक्षा दिलेल्या जिल्हयाच्या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

दिनांक ०७/०६/२०१८ आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई